ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.


वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३१ | पुणे, बुधवार २१ सप्टेंबर, १९६६ | अंक १८



## बँकेच्या एका शाखेतील शिल्लक दुसऱ्या शाखेवरील चेकला उपयोगी पडणार नाही

### मद्रास हायकोर्टाचा निवाडा

एन्. महमद हुसेन साहेब ह्यांना मद्रासच्या चार्टर्ड बँकेने ३,५०,००० रुपयांचा ओव्हरड्राफ्ट स्टॉक-इन-ट्रेडच्या तारणावर मंजूर केलेला होता. ओव्हरड्राफ्ट रकमेच्या वसुलीसाठी बँकेने कारवाई करण्यास उद्युक्त न व्हावे, ह्यासाठी एन्. ने स्थावर मिळकतींवरील हक्काबद्दलचे कागदपत्र डिपॉझिट करून बँकेला आणखी तारण दिले होते. २६-११-५६ रोजी ओव्हरड्राफ्ट २,५०,००० रु. करण्यात आला; ह्या रकमेपेक्षा जास्त कर्ज झाल्यानंतरचे एन्. चे चेक बँकेने वटविले नाहीत. अशा रीतीने चेक नापास केल्यामुळे आपल्या गिऱ्हाइकांनी आपल्यावर दावे लावून जप्त्यांचे हुकूम मिळविले आणि त्याचे रूपांतर नादारीत झाले, ह्यासाठी एन्. ने बँकेवर नुकसानभरपाईचा दावा लावला.

बँक ३,५०,००० रुपयापर्यंत ओव्हरड्राफ्ट देण्यास बांधलेली आहे; तिला तो कमी करता येणार नाही, असे अर्जदाराचे म्हणणे. तारणाच्या काही भागाइतकेच कर्ज बँकेने दिल्यामुळे गहाणाचा करार रद्द करण्यांचा आपणांस कराराच्या कायद्याच्या ३९ व्या कलमाप्रमाणे अधिकार आहे, असेही त्याचे म्हणणे. बँकेच्या कराची शाखेतील खात्यात माझी शिल्लक होती, तेव्हा मद्रास शाखेवर काढण्यात आलेले चेक कराची खात्यातील शिलकेतून बँकेने पास करायला हवे होते, असेही त्याचे म्हणणे.

ओव्हरड्राफ्टबाबत गिऱ्हाइकाला काय सवलत असावी, हे त्या दोघांमधील करारावर अवलंबून राहते. गिऱ्हाइकाच्या खात्यात जोवर शिल्लक आहे, तोवर त्याचे चेक बँकेने पास करायलाच हवेत. पण, गिऱ्हाइकाची शिल्लक नसल्यास, चेक पास करण्याचे बँकेवर बंधन नाही; तसा वेगळा करार किंवा व्यापारी प्रथा असेल तर गोष्ट वेगळी. गिऱ्हाइकाने तारणासाठी हायपॉथिकेशन केले किंवा हक्कविषयक कागदपत्र डिपॉझिट केले, एवढ्यावरून त्या प्रमाणात बँकेने ओव्हरड्राफ्ट दिलाच पाहिजे, असे होत नाही. ओव्हरड्राफ्ट किती द्यावयाचा, हे उभयतांमधील करारावर अवलंबून आहे. ओव्हरड्राफ्टची सोय बँकेने एकतर्फी कमी केली, तर तिने गिऱ्हाइकाला तशी सूचना दिली पाहिजे.

३,५०,००० रुपयांच्या ओव्हरड्राफ्टसाठी अर्जदाराने इक्विटेबल मॉर्टगेज करून दिले होते. एक विशिष्ट रकम गिऱ्हाइकास देण्याबाबत करार झालेला असता आणि बँकेने ती रक्कम दिली नसती, तर ३९ वे कलम लागू पडले असते. परंतु येथे, लिमिट ठरलेल्या ओव्हरड्राफ्टसाठी गहाणाचे कागद केले गेले होते.

खातेदाराची बँकेत अनेक खाती असली, ती वेगवेगळ्या शाखांतून असली तरी ती सर्व एकत्र करून खातेदाराच्या शिलकेचा हिशेब करण्याचा बँकेला अधिकार आहे. परंतु, खातेदाराला तसा अधिकार नाही; एका खात्यातील शिलकेचा उपयोग दुसऱ्या खात्यावर काढलेल्या चेकसाठी त्याला करून घेता येणार नाही. कराची शाखेत पैसे शिल्लक आहेत म्हणून मद्रास शाखेने ओव्हरड्राफ्टच्या मर्यादेबाहेरचा चेक पास केला पाहिजे, असे त्याला म्हणता येणार नाही. कराची शाखेत त्याची शिल्लक आहे, म्हणून मद्रास शाखेवर पैसे देण्याचे बंधन नाही.






# अर्थ

बुधवार, २१ सप्टेंबर, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सहकारी बँकांचे शेडयूल्ड बँकिंग क्षेत्रात पदार्पण

### आता बँकांचे आठ प्रकार झाले

रिझर्व्ह बँकेच्या शेडयूल्ड बँकांच्या परिस्थितीबाबत साप्ताहिक पत्रकात आता एका नव्या नोंदीस स्थान मिळू लागले आहे. साप्ताहिक पत्रकाच्या स्वरूपात आणि तपशिलात बदल झालेला नाही, पण ७६ व्यापारी शेडयूल्ड बँकांच्या आकड्याप्रमाणे १२ राज्य सहकारी बँकांचेही आकडे त्यात दाखविण्यात येऊ लागले आहेत. कारण, १९६५ च्या कायद्याप्रमाणे राज्य सहकारी बँकांनाही रिझर्व्ह बँकेच्या दुसऱ्या शेडयूलमध्ये स्थान मिळाले आहे. ह्या कायद्याला राष्ट्रपतींनी २५ सप्टेंबर, १९६५ रोजी मान्यता दिली आणि तो १ मार्च, १९६६ रोजी अंमलात आला. त्या अन्वये रिझर्व्ह बँक कायद्याच्या आणि बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या काही तरतुदी राज्य सहकारी बँकांना, मध्यवर्ती सहकारी बँकांना, मोठ्या बिगर-शेती पतपेढ्यांना आणि त्यातल्या विशेषतः अर्बन सहकारी बँकांना लागू झाल्या. बँकिंग कंपन्यांच्या कायद्याचे क्षेत्र विस्तारल्यामुळे त्याचे नावही बदलून बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट असे करण्यात आले.

राज्य सहकारी बँकांना दुसऱ्या शेडयूलमध्ये येण्याची कायदेशीर तजवीज झाली, पण रिझर्व बँकेने २ जुलै, १९६६ पर्यंत आपला ह्याबाबत अधिकार वापरला नाही. त्या दिवशी काही राज्य सहकारी बँका दुसऱ्या शेडयूलमध्ये दाखल करून घेण्यात आल्या. पण त्यांना रिझर्व बँक कायद्याच्या ४२ (२) कलमाची पहिले पाच आठवडे सवलत देण्यात आली. राज्य सहकारी बँकांची एकूण संख्या २१ असली तरी, शेडयूल्ड राज्य सहकारी बँका फक्त १२ आहेत. कोणतीही बँक दुसऱ्या शेडयूलमध्ये घ्यावयाची, तर तिचे वसूल भांडवल अधिक गंगाजळी ह्यांची खरी (पुस्तकी नव्हे) किंमत किमान ५ लक्ष रुपये भरली पाहिजे. जून, १९६४ अखेरच्या आकड्यांप्रमाणे गोवा, दमण आणि दिव राज्य सहकारी बँक सोडून बाकी सर्व बँकांचे वसूल भांडवल अधिक गंगाजळी ५ लक्ष रुपयांवर होती; तेव्हा त्यापैकी कित्येकांच्या बाबतीत ही किंमत फक्त पुस्तकीच होती, असे म्हणावे लागेल. किंवा, दुसरी अट त्या पुरी पाडू शकल्या नसतील, आणि ती म्हणजे "त्यांचा कारभार ठेवीदारांचे हितास बाध येईल असा असता कामा नये". ह्याचा अर्थ, ह्या राज्य सहकारी बँकांना दुसऱ्या शेडयूलमध्ये येण्यासाठी जरूर ते उपाय योजावे लागतील. तोपर्यंत त्यांचा दर्जा बिगर-शेडयूल्ड बँकांच्यासारखाच राहील. मध्यवर्ती सहकारी बँका, अर्बन बँका, इत्यादींच्या पंक्तीस त्यांना बसावे लागेल.

वेगवेगळ्या आकाराच्या, कार्यपद्धती भिन्नभिन्न असणाऱ्या, कर्जपुरवठा करण्याचे प्रकार वेगवेगळे असणाऱ्या, कारभाराच्या दर्जात फरक असणाऱ्या बँकांशी रिझर्व्ह बँकेचा आता प्रथमच संबंध येत आहे. बँकिंग कंपन्यांचा कायदा अमलात आल्यानंतर १७ वर्षांनी हे घडून येत आहे. एकूण व्यापारी बँकांची संख्या कमी कमी होत चालली आहे आणि एक-दोन वर्षांनी सुमारे ८० लायसेन्सधारी, शेडयूल्ड बँका उरतील अशी परिस्थिती होती. बँकिंग रेग्युलेशन कायदा आता पुन्हा सरमिसळ निर्माण करीत आहे. ह्यापुढे आठ प्रकारच्या बँका राहतील :— (१) शेडयूल्ड, लायसेन्सदार व्यापारी बँका, (२) शेडयूल्ड लायसेन्सदार सहकारी बँका, (३) शेडयूल्ड बिगर-लायसेन्सदार व्यापारी बँका, (४) शेडयूल्ड बिगर-लायसेन्सदार सहकारी बँका, (५) बिगर-शेडयूल्ड लायसेन्सदार व्यापारी बँका, (६) बिगर-शेडयूल्ड लायसेन्सदार सहकारी बँका, (७) बिगर-शेडयूल्ड बिगर-लायसेन्सदार व्यापारी बँका, आणि (८) बिगर-शेडयूल्ड बिगर-लायसेन्सदार सहकारी बँका. ह्या सर्व गोंधळाचा बँकिंग-विषयक तुलनात्मक आकडेवारीवर परिणाम झाल्याविना राहणार नाही. सहकारी बँकाचे शेडयूल्ड बँकिंग पद्धतीमधील पदार्पण अशा प्रकारचे आहे.

---

### चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाबद्दल धोक्याचा इशारा

चौथा पंचवार्षिक कार्यक्रम हा फार अवाढव्य असल्याने तो देशाच्या साधनसंपत्तीला पेलणार नाही अशी टीका अनेकदा करण्यात आलेली आहे. आता रिझर्व बँकेच्या गव्हर्नरांनीही भारताच्या अर्थमंत्र्यांना ह्याविषयी एक पत्र पाठवून धोक्याचा इशारा दिला आहे. ह्या कार्यक्रमातील खर्चाचा जो आराखडा प्रसिद्ध करण्यात आला आहे त्यावरून परदेशीय देण्याघेण्याच्या बाबतीत पुन्हा पुन्हा अडचणी उत्पन्न होत राहतील हे दिसून येत आहे, असे त्यांनी पत्रात सुचविले आहे. त्यांच्या मताने कार्यक्रमाचा आकार जर लहान करण्यात आला नाही तर आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याचे व्यवहार अधिकच संकट-ग्रस्त होत जातील आणि त्याचा परिणाम म्हणून देशाला परदेशीय मदतीशिवाय पाऊलही उचलणे शक्य होणार नाही. पत्रात पुढे असे म्हटले आहे की, चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला आधारभूत धरण्यात आलेली मूळ परिस्थितीच विवाद्य आहे. त्यातही परदेशीय चलनातील खर्चाविषयी गृहीत धरण्यात आलेला अंदाज तर फारच शंकास्पद आहे. कारण काही कारणाने धरलेल्या अंदाजापेक्षा अधिक खर्च करण्याची पाळी आल्यास त्याची व्यवस्था कार्यक्रमात करण्यात आलेली नाही. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमातील परदेशीय चलनाच्या खर्चात झालेली वाढ लक्षात घेण्यासारखी आहे. सध्या भारताच्या परदेशीय चलनाचा साठा अगदी तळाला गेलेला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमधून संकटकालात मदत मिळण्याची शक्यताही फारशी नाही. ह्या निधी-तून भारताने खूप पैसा आधीच काढलेला आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ५,१०० कोटी रुपये किमतीची निर्यात होऊ शकेल असा अंदाज करण्यात आलेला आहे. पण, हा अंदाज अवास्तव आशावादी आहे. अशा परिस्थितीत आयात कमी करून ४ था कार्यक्रम लहान करणे हा एकच उपाय आहे.

### गुजरात राज्यात लष्करी शिक्षणाची संस्था

गुजरात राज्यात नागरिकांना लष्करी शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी एक संस्था स्थापन करण्यात आली आहे. संस्थेच्या इमारतीच्या पायाचा दगड संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या हस्ते बसविण्यात आला. अहमदाबाद मिलिटरी अँड रायफल ट्रेनिंग असोसिएशनने ह्या बाबतीत पुढाकार घेतला आहे. लष्करी शिक्षणाच्या योजनेला १५ लाख रुपये खर्च येणार आहे. गुजरात सरकारने संस्थेला २० हजार चौरस वार जागा दिली आहे. अहमदाबादमधील दोन संस्थांनी योजनेस मदत म्हणून ५० व २५ हजार रुपये देण्या जाहीर केल्या आहेत. त्यांचा विनियोग शस्त्रागार आणि गोळीबाराच्या सरावाचे मैदान तयार करण्यासाठी होणार आहे. ह्या प्रसंगी बोलताना श्री. चव्हाण ह्यांनी लोकांच्या मनोधैर्यावर शस्त्राइतकाच जोर दिला.

---

### पाकिस्तानच्या प्रचार-युद्धाला चीनचा हातभार

पाकिस्तानच्या भारतद्वेषी आघाडीत चीन राजकीय आणि लष्करी दृष्टीने सामील झालेला आहेच, पण प्रचाराच्या आघाडीतही भारतावर चिखलफेक करण्याच्या कामी तो हातभार लावीत आहे. नुकत्याच झालेल्या पावसाच्या झडीमुळे राजस्तान-सिंध सरहद्दीवरील घग्गर नदीला पूर येऊन राजस्तानातील सुरतगढ शेतवाडीचा काही भाग जलमय झाला होता. त्याचा फायदा घेऊन पाकिस्तान टाइम्सने ही नदी भारतीय अधिकाऱ्यांनी मुद्दाम वळवून तिचे पाणी पाकिस्तानात सोडले असा आरोप केला होता. चीनने पाकिस्तान टाइम्समधील हे वृत्त देऊन बिकानेर भागातील घग्गर नदीच्या पुराचे पाणी पाकिस्तानातील फोर्ट अब्बासकडे वळविण्यात आल्याचे प्रसिद्ध केले आहे. पाकिस्तानचे आर्थिक नुकसान करून तेथील लोकांची दैना उडविण्याचा भारताचा हेतू असल्याचेही चिनी वृत्तसंस्थेने प्रसृत केले आहे.

### जम्मूमधील रणभूमीची मशागत

जम्मूमधील जौरिअन भागात गेल्या वर्षीच्या भारत-पाक युद्धात पाकिस्तानच्या लष्कराने धुमाकूळ घातला होता. पाकलष्कर परतले; पण त्याने जाताना अतोनात हानि केली. ह्या विभागातील २४ हजार एकरांत आता खरीपाची पिके डोलत आहेत. आणखी ३८ हजार एकर जमीन रबी पिकाखाली आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. ताश्कंद करार झाल्यावर सुमारे ७५ हजार शेतकरी ह्या भागात पुन्हा आपापल्या ठिकाणी आले. सरकारने दिलेल्या ५० ट्रॅक्टर्सच्या साह्याने पाकच्या लष्कराने केलेली सर्व हानी त्यांनी भरून काढली आहे. सरकारी सवलतींचा ते चांगला उपयोग करून घेत आहेत.

---

### पाकिस्तानला रशियाची आर्थिक मदत

पाकिस्तान आणि रशिया ह्यांच्या दरम्यान आर्थिक सहकार्याच्या करारावर सह्या करण्यात आल्या आहेत. कराराला अनुसरून उष्णतेच्या साह्याने वीज तयार करण्याचे एक केंद्र उभारण्यासाठी रशिया पाकिस्तानला मदत देणार आहे. विजेच्या वाहनासाठी लागणारी सर्व सामग्रीही रशिया पुरवील. त्याशिवाय विजेची यंत्रसामग्री तयार करणारे दोन कारखानेही रशिया उभारून देणार आहे. ध्वनिक्षेपणाचे भारी शक्तीचे केंद्र उभारण्यासाठी रशियाने भारताला साह्य करण्याचे कबूल केले आहे. अशीच मदत पाकिस्तानलाही करण्यात येणार आहे. जमीन सुधारणा करण्यासाठी लागणारी अवजड यंत्रे पुरविणे, खनिज संपत्तीचा शोध लावण्यासाठी पाहणी करणे, इत्यादी बाबतीतही रशिआ पाकिस्तानला मदत करणार आहे. पूर्व पाकिस्तानातील एक पूल रशिया बांधून देणार आहे. ही सर्व मदत पाकिस्तानच्या १९६६—७० च्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी आहे.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

( रजिस्टर्ड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २ )

स्थापना : १६ सप्टेंबर १९३५

| | १९५५ | १९६० | १९६६ |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. १६ लक्ष | रु. ३२ लक्ष | रु. १ कोटी |
| गंगाजळी | रु. ७.७५ लक्ष | रु. १७ लक्ष | रु. ३७ लक्ष |
| ठेवी | रु. ५ कोटी | रु. १५ कोटी | रु. ५० कोटींहून अधिक |

आपल्या १०८ शाखांनिशी आपल्या सेवेस सदैव सिद्ध

विदेश विनिमय व एक्झिक्युटर आणि ट्रस्टी सेवा यांच्यासह बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सविस्तर माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेला भेट द्या.

कर्वे रोड, ( पुणे-४ ), डोंबिवली, नौपाडा ( ठाणे ), कॉफर्ड मार्केट ( मुंबई ) येथे लौकरच शाखा सुरू होत आहेत.

☆ ☆ ☆ ☆ चि. वि. जोग, ☆

जनरल मॅनेजर.

## श्रीमंत देश अधिकच श्रीमंत झाले

इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाचा २१ वा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. जगाच्या आर्थिक परिस्थितीचे पैशाच्या देवाणघेवाणीच्या रूपाने उमटणारे चित्र त्यात दिसून येते. हे चित्र फारसे आशादायक नाही. मागासलेल्या देशांची दैन्यावस्था दूर करण्यासाठी भरभराटलेल्या देशांनी आर्थिक मदत करण्याचे तत्त्व सर्वत्र मान्य झाले असले तरी व्यवहारात त्याचा पडताळा बेताचाच येत आहे. अहवालातील माहितीप्रमाणे प्रगत देशांतील विकासाचा वेग सतत वाढत आहे. परंतु ह्या देशांकडून अविकसित देशांना मिळणाऱ्या दीर्घ मुदतीच्या द्रव्यप्रवाहात मात्र वाढ झालेली नाही. औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांनी आपल्या आर्थिक मदतीच्या कार्यक्रमात अविकसित देशांना द्यावयाच्या साह्याला अग्रक्रम दिला पाहिजे अशी सूचनाही अहवालात करण्यात आली आहे. अविकसित देश मुख्यत: प्राथमिक अवस्थेत असणारा कच्चा माल निर्यात करणारे असतात. त्यांच्या ह्या मालाच्या निर्यातीत एकदम चढउतार झाल्यास ह्या घटनेचा त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या विकासावर वाईट परिणाम होतो, आणि परदेशीय चलनाच्या त्यांच्या प्राप्तीत घट होते. गेल्या वर्षी ह्या देशांच्या प्राथमिक स्वरूपाच्या मालाच्या निर्यातीने होणाऱ्या प्राप्तीत घट झालेली आढळून येते. एकंदरीने जगाच्या आर्थिक अवस्थेचे चित्र फारसे वाईट नाही आणि फारसे उत्साहजनकही नाही. पुढारलेल्या प्रमुख देशांतून चलनवृद्धीचा दाब वाढत चाललेला आहे. अर्थात वस्तूंच्या किमती वाढण्याची प्रवृत्ती दिसून येत आहे. दुसरे महायुद्ध संपल्यापासून कधीही नव्हती इतकी रोजगारीची उंच पातळी ह्या देशांतून गाठण्यात आली आहे. गेल्या १२ महिन्यांत अमेरिका, कॅनडा, युरोप, आणि जपान ह्या ठिकाणी उत्पादन चांगले वाढले आहे.

---

## मार्जार सप्ताह पाळण्याची सूचना

अमेरिकेत मांजर ह्या प्राण्याविषयी आस्था असणाऱ्या लोकांची एक संघटना आहे. ह्या संघटनेने जगातील मांजर प्रिय असणाऱ्यांना व पाळणाऱ्यांना अशी सूचना केली आहे की त्यांनी येत्या ७ नोव्हेंबरपासून सुरू होणारा एक आठवडा मार्जारसप्ताह म्हणून पाळावा. अमेरिकेतील मांजरांची सर्व प्रकारची सेवा करणे हा संघटनेचा हेतू आहे. संघटनेने मांजर ह्या प्राण्याविषयी खूप लिखाण प्रसिद्ध केलेले असून त्यात ह्या प्राण्याची उपयुक्तता पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. अमेरिकेत घरातून पाळण्यात आलेल्या मांजरांची संख्या जवळजवळ २·१ कोटी आहे. ह्या मांजरांची चांगली सोय अर्थातच झाली आहे. पण, त्याशिवाय सुमारे १ कोटी भटकी निराधार मांजरे असून त्यांच्या योगक्षेमाची मात्र कांही तजवीज नाही. ह्यापैकी कितीतरी मांजरे अर्थातच भुकेली, आजारी व अन्नदृष्ट्या उपेक्षित असतात. अनेक धडीकडी अणि निरोगी मांजरे अमेरिकेत निष्कारण मारण्यात येतात. त्यांपैकी प्रत्येक मांजर रोज निदान तेरा तरी उंदीर मारू शकेल असा अंदाज संघटनेने केला आहे. निसर्गाच्या व्यवस्थेत मांजरांची संख्या व उंदरांची संख्या ह्यांच्या दरम्यान काही समतोल राखला जातो. मांजरांची हत्या होत गेली तर हा समतोल बिघडेल आणि त्यामुळे सार्वजनिक आरोग्याला धोका पोचेल असा इषाराही संघटनेने दिला आहे. उंदीर हा प्राणी खाद्यपदार्थांची नासाडी तर करतोच, पण लहान मुलांना आणि वृद्धांना चावण्यासही घाबरत नाही. मुलांनी मांजर पाळल्यास मुले वेड्यावाकड्या मार्गाला लागण्याची शक्यताही खूप कमी होते असे संघटनेचे मत आहे. अमेरिकेतील २० टक्के घरांतून मिळून प्रत्येकी सरासरीने १·२ मांजरे आहेत.

---

## सुताच्या नव्या गिरण्यांना विरोध

इंडियन कॉटन मिल्स असोसिएशनने नियोजन समितीकडे एक निवेदन पाठवून सहकारी व सार्वजनिक मालकीच्या विभागात सुताच्या गिरण्या काढण्याच्या निर्णयाचा फेरविचार करण्याची विनंती केली आहे. सरकारी साधनसंपत्तीचा उपयोग करून निर्यातीची वाढ करण्यासाठी काढण्यात येणाऱ्या अशा गिरण्यांमुळे भांडवलाचा निष्कारण अपव्यय होईल अशी भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे. निवेदनात असे म्हटले आहे की, सहकारी क्षेत्रात सुताच्या गिरण्या काढण्यामुळे सरकारच्या द्रव्यसाधनांवर आणि मनुष्यबळावर विनाकारण ताण पडणार आहे. कारण, सरकारजवळील साधनसामग्री व तंत्रज्ञांचा आणि कारभाऱ्यांचा पुरवठा दोन्हीही मर्यादित आहेत. त्यांचा असा गैरवापर न करताही निर्यातीचे कार्य कार्यक्षमतेने करता येण्यासारखे आहे. सुताच्या गिरण्यांतील उत्पादन वाढविण्याच्या कामी नव्या चात्या बसविण्यात काही अडचणी नाहीत. कापडाच्या गिरण्यांत नवे मागही बसविता येतील. उत्पादन वाढण्याच्या बाबतीत कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा हे खरे कारण आहे. प्राप्त परिस्थितीत जितकी निर्यात करता येणे शक्य आहे तितकी करण्यात येत आहे. परंतु उत्पादनाचा खर्च इतर देशांच्या मानाने अधिक असल्याने हिंदी कापड स्पर्धेत टिकाव धरू शकत नाही. ह्यावर सहकारी व सार्वजनिक मालकीच्या नव्या गिरण्या काढणे हा उपाय नसून देशातील कापडाच्या व सुताच्या उत्पादनाचा खर्च कमी करणे हा आहे. ४० ते ५० कोटी रु. खर्च करून नव्या गिरण्या उभारण्यापेक्षा कापसाचे उत्पादन वाढविण्याचा तातडीचा कार्यक्रम हाती घेणे अधिक हिताचे ठरेल. चांगल्या दर्जाच्या कापसाचे उत्पादन वाढविण्याच्या कार्यक्रमासाठी वर्षाकाठी २० ते २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येणार नाही.

---

## परदेशात वैदिक संस्कृतीच्या निशाण्या

दिल्ली येथील इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ इंडियन कल्चर ह्या संस्थेचे चालक डॉ. लोकेश चंद्र ह्यांनी वैदिक संस्कृतीच्या परदेशांतील अवशेषांबद्दल महत्त्वाची माहिती सांगितली आहे. डॉ. चंद्र हे सैबेरियात गेले असता त्यांना एका देवळात प्राण्यांच्या दोन प्रतिमा आढळून आल्या. स्थानिक लोकांच्या मताने त्या भारतातील प्राण्यांच्या आहेत आणि त्यांच्याबद्दल लोकांना फार आदर वाटतो. ह्याच देवळात त्यांना पाणिनीच्या संस्कृत व्याकरणाची प्रत सापडली. त्यावरील दोन टीकाही तेथे उपलब्ध झाल्या. ह्या टीका १३ व्या अगर १४ व्या शतकातील आहेत. रशियात ६,००० महत्त्वाचे संस्कृत ग्रंथ आहेत. हिंदमध्ये अवघे १,००० प्राचीन संस्कृत ग्रंथ आहेत. बाकीचे नाहीसे झाले आहेत. मंगोलियात भारताबद्दल आदराची भावना आहे. तेथे अजूनही शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथांचा उपयोग करण्यात येतो. मंगोलियाच्या उपपंतप्रधानाच्या पत्नीचे नांव 'इंद्रिरी' असे आहे. थायलँडचा राजा अजूनही मनुस्मृतीचे पालन करतो. जपानमधील एक हजार देवळांत तरी संस्कृत वचने कोरलेली आहेत.

---

**पहिली निग्रो स्त्री–न्यायाधीश**— अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच एका निग्रो स्त्रीची फेडरल कोर्टाचा न्यायाधीश म्हणून नेमणूक करण्यात आली असून सदर नेमणुकीला अमेरिकेच्या सिनेट सभेने मान्यताही दिली आहे. ह्या स्त्रीचे नाव मिसेस कॉन्स्टन्स बेकर मोटले असे असून ती अमेरिकेतील वर्णीय लोकांचे हितरक्षण करणाऱ्या संघटनेची कायद्याची सल्लागार होती.

**पाकिस्तानची रशिआकडे मागणी**— पाकिस्तानच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेस रशिआची मदत मिळविण्यासाठी पाकिस्तानचे पाचजणांचे एक प्रतिनिधी मंडळ मॉस्कोला गेले आहे. पाकिस्तानला रशिआकडून मुख्यतः वीजनिर्मिती, औद्योगिक यंत्रसामग्री आणि ध्वनिक्षेपणाचे साहित्य ह्या बाबतींतील मदत हवी आहे. मदतीच्या मसुद्यावर अखेरचा हात फिरविण्याचे आता बाकी आहे.

**रस्तेवाहतुकीचा विकास**—गुजरात राज्याच्या ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात राज्यातील रस्तावाहतुकीचा विकास करण्याची एक योजना गुजरात राज्य स्टेट ट्रॅन्पोर्ट कॉर्पोरेशनने तयार केली आहे. ह्या योजनेसाठी २० कोटी रुपये खर्च येणार आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात कॉर्पोरेशनच्या बसेसची संख्या ४,५०० पर्यंत वाढणार आहे. १९६६ मध्ये २,७०० बसेस चालू होत्या.

**माध्यमिक शिक्षकांचे वेतन**—हिंदमधील माध्यमिक शिक्षकांची संख्या २० लाखांच्या आसपास आहे. त्यांचे वेतन दरमहा १५ ते ३० रुपयांनी तरी वाढविण्यात येण्याची आवश्यकता मान्य करण्यात येते. परंतु इतकी वेतनवाढ करावयाची म्हटले तर दरसाल ५०कोटी रुपये उभे करावे लागतील. माध्यमिक शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न राज्य सरकारांच्या अधिकारातील आहे. राज्य सरकारांजवळ पैशाची टंचाई आहे.

**नवा सहकारी साखर-कारखाना**—नगर जिल्ह्यात सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणारा ८वा कारखाना काढण्यात येणार आहे. नगर जिल्ह्यातील संगमनेर आणि अकोला तालुक्यांतील दुष्काळी परिस्थिती ह्या कारखान्यामुळे सुधारणार आहे. कारखान्याचे भांडवल १ कोटी रुपयांचे असून त्यात सुरुवातीला रोज ८०० टन ऊस गाळणारी यंत्रसामग्री बसविण्यात येणार आहे. कारखान्याच्या ४,७०० भागधारकांपैकी बहुतेकांची उसाची लागवड एक एकर अगर त्याहीपेक्षा कमी आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

सरदारगृह
मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमची वैशिष्ट्ये —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेलं स्मारक.
फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting
GADRE BANDHU
MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
MADHAVNAGAR (S.R.) INDIA

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०२
( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००
( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध
( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.
अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

## श्री. व्यंकटराव भाऊसाहेब हिरे, एम्. एल्. ए.



चेअरमन, गिरणा सह. सा. कारखाना लि.

श्री. व्यंकटराव भाऊसाहेब हिरे यांचा जन्म ता. २४-४-१९२८ रोजी मु. दाभाडी, ता. मालेगाव, जि. नासिक येथे झाला. सहकार महर्षी कै. भाऊसाहेब हिरे यांचे ते जेष्ठ चिरंजीव होत. कै. भाऊसाहेब यांनी आपली उभी हयात महाराष्ट्राच्या सहकार व शिक्षण क्षेत्राचे भवितव्य उज्ज्वल करण्यात वेचली. त्यांच्या ध्येय धोरणाचे बाळकडू श्री. व्यंकटराव यांना अगदी लहानपणापासून मिळाले. आजचा महाराष्ट्र घडवताना कै. भाऊसाहेब हिरे ह्यांनी जे महान् समाजकार्य केले त्याचे इत्थंभूत पडसाद श्री. व्यंकटराव यांचे मनावर कोमल वयातच उमटले असल्यास नवल नाही.

श्री. व्यंकटराव यांचे शालेय शिक्षण मालेगाव येथे प्राथमिक विद्यालयात सुरू झाले. दुय्यम शिक्षण मालेगाव, बोर्डी व नासिक येथे संपवून उच्च शिक्षणासाठी त्यांनी एच. पी. टी. कॉलेज नासिक व रुपारेल कॉलेज मुंबई येथे टर्मर्स् भरल्या.

शालेय जीवनात एक निष्णात खिलाडू म्हणून त्यांनी क्रीडाक्षेत्रात बरेच नैपुण्य संपादन केले. मर्दानी खेळांच्या सांघिक स्पर्धा त्यांच्या कुशल धुरीणत्वामुळे गौरवास्पद ठरत. संघटनाकौशल्य व कर्णधारपटुता ही दोन्ही त्यांचे ठायी अभिजात व्यक्त होतात. वडिलांच्या सहवासांत त्यांच्या या सुप्त गुणांचा जो परिपोष होत गेला त्याची साक्ष त्यांच्या शालेय जीवनांत क्रमशः पटत गेली. शिक्षणक्रम चालू होता, आणि ऐन उमेदीत असताना देशात राष्ट्रीय चळवळीचे लोण कोपऱ्याकोपऱ्यात पोचत होते. अशा वेळी त्यांच्या हृदयात रुजलेल्या बीजांकुराचे जोरदार वृक्षांत रूपांतर होण्यास अवधी लागला नाही. राष्ट्रसेवादल व यूथ काँग्रेससारख्या संस्थांतून हिरीरीने भाग घेऊन राष्ट्रीय चळवळीस बळकटी आणण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चालू असे. या चळवळीस दडपून टाकण्याचा ब्रिटिश अमदानीत पोलीसकरवी जो प्रयत्न चालू होता त्यात प्रसंगी भीषण लाठीहल्ल्यालादेखील त्यांनी धीराने तोंड दिले आहे. अशा संकटाने ते कधीच डगमगून गेले नाहीत. उलट त्यांच्या दुर्दम्य उत्साहाला अशा वेळी उधाण येत असे. अंगीकृत कार्यात येणाऱ्या अडचणी उल्लंघून उद्दिष्ट साधण्याची त्यांची ज़िद्द त्यांना कधीच स्वस्थ बसू देत नसे. त्यांच्या या छंदापायी त्यांचे लक्ष शिक्षणातून उडाले. त्यांतच योगायोग असा की, कै. भाऊसाहेब हिरे ह्यांनी आपल्या व्यापार-उदीमाची सर्व जबाबदारी याच वेळी श्री. व्यंकटराव यांचेवर सोपविली व आपला सर्व वेळ ते समाज कार्यात व स्वतंत्र महाराष्ट्राच्या शिल्पकार्यात व्यतीत करू लागले. त्यामुळे श्री. व्यंकटराव यांना शिक्षणाला अर्ध्यातच रामराम ठोकावा लागला. तेव्हांपासून ते व्यापारी क्षेत्रात उतरले आणि अल्पावधीत त्यांनी आपल्या कर्तबगारीने त्या क्षेत्रातसुद्धा आपले वैशिष्ट्य प्रस्थापित केले. आपली ही नवी जबाबदारी त्यांनी आपल्या पित्याच्या अपेक्षेहून अधिक उत्तम रीतीने पार पाडून त्यांना आपले कार्य निर्वेधपणे चालू ठेवण्यास मोकळीक दिली. अर्थात श्री. व्यंकटराव यांनी आजचा महाराष्ट्र घडविण्याचे कामी पर्याये बहुमोल मदत केली आहे हे उघड आहे. व्यापारउदीम, घरप्रपंच, इत्यादींची सर्व जबाबदारी त्यांनी आपल्या अंगावर घेतली ती नितांत पितृभक्ती व गरीब महाराष्ट्राचा उद्धार या दोहोंनी प्रेरित होऊनच घेतली. ऐश्वर्यजन्य उपभोगलालसा अगर सुखासीनता या दोहोंचा मोह त्यांनी ऐन तारुण्यात टाळला आहे. कै. भाऊसाहेब यांना १९६२-६३ चे सार्वजनिक निवडणुकीत मालेगाव व नांदगाव मतदार संघातून एम्. एल्. ए. च्या जागेसाठी तिकीट दिल्याचे काँग्रेस पक्षाने जाहीर केले होते. आणि समाजकार्य व राजकारण यातच त्यांचा सर्व वेळ चालला होता. परंतु निवडणूक होण्यापूर्वी दि. ६ नोव्हेंबर १९६१ या दुर्दिनी अखिल महाराष्ट्राला शोकसागरात लोटून भाऊसाहेब अकस्मात निवर्तले. जिल्हा विकासाचा अफाट संसार कोण चालवील असे अनेकांनी उद्गार उद्गार काढले. पित्यावरील अपरंपार भक्तीने श्री. व्यंकटराव यांनी जो वारसा खाजगी क्षेत्रात शिरोधार्य मानला तो या वेळी संपूर्णतया घेण्याची जबाबदारी त्यांचेवर आली. आपले सर्व दुःख पचवून त्यांनी जनताजनार्दनाचा आदेश शिरसावंद्य मानला. काँग्रेसश्रेष्ठींनीदेखील जनतेच्या विनंतीप्रमाणे ते तिकीट श्री. व्यंकटराव यांना त्याच मतदार संघात उभे राहण्यासाठी दिले. निवडणुकीत प्रचंड मताधिक्याने ते यशस्वी झाले आणि त्याच क्षणापासून त्यांच्या कार्यव्याप्तीचे क्षितिज विस्तार पावू लागले. म्हणून पर्याये त्यांना आपली खाजगी जबाबदारी आपले धाकटे बंधू श्री. अशोकराव यांचेवर सोपवावी लागली. ते स्वभावतः कार्यतत्पर व धाडसी असल्याने राजकारणात त्यांचे सर्व थरातल्या जनतेने चांगलेच स्वागत केले. त्यातल्यात्यात शिक्षण क्षेत्र व सहकारी क्षेत्र या दोहोमधील, आपल्या दिवंगत पित्याची परंपरा त्यांनी फारच कौशल्याने चालू ठेवली.

महात्मा गांधी विद्यामंदिर, नासिक जिल्हा भू विकास बँक, नासिक जिल्हा मध्य सह. बँक, महाराष्ट्र राज्य सह. बँक लि., मुंबई, महाराष्ट्र राज्य भू विकास बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, गिरणा सहकारी साखर कारखाना लि., दाभाडी, निफाड सहकारी साखर कारखाना लि., निफाड, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ व अन्य संस्थांमधून त्यांनी आपल्या मार्गदर्शनाने बहुमोल कार्य केले आहे. कृषिजीवनाचे कष्ट व असहायता यांचा त्यांना अगदी जवळून परिचय आहे. शेतकी विकास कार्य सुकर व्हावे म्हणून प्रसंगी सहकारी बँकेची बंधने थोडीफार सैल करून असहाय शेतकऱ्यांच्या निकडीच्या गरजा स्वतः लक्ष घालून भागविण्याचे धोरण ठेवले. भू विकास बँकेतील रेंगाळणारी प्रकरणे त्यांनी विशिष्ट ध्येय-धोरण अवलंबून स्वतःच्या मार्गदर्शनाखाली त्वरित हातावेगळी करण्यात मदत केली. त्यांच्या या धोरणामुळे नासिक जिल्हा भू विकास बँकेची कर्जवाटपमर्यादा काही लाखांवरून दीड कोटी रुपयांचेवर गेली. सहकारी क्षेत्रातील त्यांचा अनुभव फार गाढा असल्याने

त्यांची निवड वेगवेगळ्या सहकारी संस्थांतून प्रचंड बहुमताने झाल्यास नवल नाही.

आज जरी ते राजकारणात मुरब्बी कार्यकर्ते म्हणून सतत कार्यरत असले, तरी गरीब शेतकऱ्यांच्या विकासासाठी त्यांचे मार्गदर्शन मिळावे म्हणून त्यांची निवड खालील संस्थांचे चेअरमन वा डायरेक्टर म्हणून आताही जनतेने अत्याग्रहाने केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई डायरेक्टर
महाराष्ट्र राज्य सहकारी संघ लि., " "
महाराष्ट्र राज्य भू विकास बँक लि., " "
महाराष्ट्र राज्य सह.खरेदी विक्री संघ लि., मुंबई "
महाराष्ट्र राज्य सह. साखर कारखाना संघ लि., मुंबई "
नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नासिक —चेअरमन.
गिरणा सहकारी साखर कारखाना लि., दाभाडी.—चेअरमन
नासिक जिल्हा सहकारी प्रिंटिंग प्रेस, लि., नाशिक, — चेअरमन
जिल्हा परिषद नासिक — नॉमिनी
नासिक जिल्हा अन्नधान्य सल्लागार समिती नासिक, — प्रतिनिधी
पोस्ट ॲण्ड टेलिग्राम ॲडव्हायजरी कमेटी नासिक—प्रतिनिधी
गिरणा धरण पुनर्वसाहत सल्लागार समिती नासिक — प्रतिनिधी
आदिवासी सेवा समिति नासिक — ट्रेझरर
इंडस्ट्रियल टेक्निकल इन्स्टिटयूट नासिक — प्रतिनिधी
कळवण तालुका सहकारी ऑईल मिल लि., कळवण — चीफ प्रमोटर
पिंपळगाव फळ प्रक्रिया सहकारी सोसायटी लि., पिंपळगाव — संचालक
मालेगाव शहर ग्राहक सहकारी संघ लि., मालेगाव, — संचालक
सरस्वती मंदिर सटाणा — ट्रेझरर
महात्मा गांधी विद्या मंदिर मालेगाव "
प्राथमिक शिक्षण प्रसारक मंडळ मालेगाव "
पूज्य भाऊसाहेब हिरे शिक्षण निधी सहकारी सोसायटी लि., नासिक — चेअरमन व ट्रेझरर
शिक्षण प्रसारक मंडळ निमगाव "

या सर्वच संस्थांच्या दैनंदिन कारभारात श्री. व्यंकटराव यांनी आपल्या निष्णात मार्गदर्शनाने गौरवास्पद उन्नती घडवून आणली आहे. त्यांच्या प्रेरणेनेच संस्थांचा सर्वांगीण उत्कर्ष होत आहे, जनता-जनार्दनाची भक्तियुक्त श्रद्धा त्यांचे पाठीशी निरंतर असल्याने संस्थांच्या अनेक अडचणी अनुभवाच्या जोरावर ते चुटकीसरशी सोडवू शकतात.

या अफाट कार्यक्षेत्राचे योग्य प्रकारे संचलन करताना त्यांना अविरत कार्यमग्न राहावे लागते. त्यांची झंझावाती दौऱ्याची फेरी सदाचीच चालू असते. तडफदार वृत्ती, दुर्दम्य उत्साह व तीक्ष्ण आकलनबुद्धी या गुणांचा त्रिवेणी संगम त्यांचे ठायी असल्याने त्यांचे मार्गदर्शन सर्वांनाच बहुमोल वाटते.

गिरणा सहकारी साखर कारखान्याची सूत्रे त्यांनी ज्यावेळी आपल्याकडे घेतली तेव्हा कारखान्यापुढे नेहमीचा ऊसपुरवठ्याचा यक्ष प्रश्न उभा होता. पण आनंदाची गोष्ट म्हणजे या सिझनला जितक्या ऊसाचे गळीत झाले तेवढे कारखान्याच्या इतिहासात पूर्वी कधीच झाले नव्हते. ऊसपुरवठ्याचा प्रश्न कायमचा सुटावा म्हणून हळद्बर्डी धरणाचा भव्य प्रकल्प त्यांनी मंजूर करून घेतला. हा प्रचंड प्रकल्प दीड कोटी रुपयांचा आहे. या योजनेमुळे हजारो एकर जमीन ऊसलागवडीखाली येणार आहे. ऊसपुरवठा भरपूर व निश्चित कारणे, साखर कारखान्यालगत डिस्टीलरीचा प्लँट बसविणे, या कारखान्याची औद्योगिक वसाहत अद्ययावत करणे, शाळा, क्रीडांगण, उच्च शिक्षणाची सोय, विद्यार्थ्यांचे वसतिगृह, इत्यादी योजना लवकरात लवकर कृतीत आणण्याचा त्यांचा मानस आहे. पूज्य पित्याच्या मंगल आशीर्वादाने त्यांची सर्व उद्दिष्टे सफल होत आली आहेत. त्याप्रमाणेच हीदेखील सफल होतील यात काही शंका नाही.

## सुएज कालव्याशी स्पर्धा करणारा नवा कालवा ?

### इस्राएलचा प्रयत्न

सुएजचा कालवा इजिप्तच्या मालकीचा असून, त्याने इस्राएलच्या आगबोटींच्या वाहतुकीस बंदी केलेली आहे. सुएजच्या कालव्यापासून इजिप्तच्या सरकारला दरसाल सुमारे २०० कोटी रुपये ( सर्व परदेशी चलनांत ) उत्पन्न मिळते. आशिया आणि युरोप खंडांमधील दळणवळणाच्या ह्या कालव्याने इजिप्तला खूपच महत्त्व प्राप्त झाले आहे. आता इस्राएल स्वतःचा कालवा खोदण्याच्या विचारात असून त्यासाठी सुमारे ६,००० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. कित्येक पाश्चात्त्य बँकर्सनी भांडवल उभारणीचे बाबतीत सहकार्य देऊ केले आहे. इस्राएलने कालवा खोदलाच तर त्याची लांबी २८७ कि. मी. होईल; सुएजच्या कालव्याची लांबी १६२ कि. मी. आहे. सुएज कालव्यातून होणाऱ्या वाहतुकीत ७३% वाहतूक पेट्रोल तेलाची आहे आणि मध्यपूर्वेमधील तेल अरबांच्या हाती असल्यामुळे त्याची वाहतूक इस्राएलच्या कालव्यातून होणारच नाही, अशी इजिप्तची खात्री आहे. इजिप्त हा इस्राएलचा सर्वात मोठा शत्रू असल्यामुळे त्याचे आर्थिक नुकसान व्हावे असाच इस्राएलचा प्रयत्न राहील.

### वार्षिक अहवालांची साभार पोच

१. दि महाराष्ट्र स्टेट को. बँक लि., मुंबई.
२. मुंबई राज्य सहकारी भूतारण बँक मर्यादित, मुंबई.
३. दि वाई अर्बन को. बँक लि., वाई.
४. इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.
५. दि कराड अर्बन को. बँक लि.
६. दि भुसावळ पीपल्स को. बँक लि.
७. सांगली म्यु. सर्व्हंट्स को. क्रे. सोसायटी लि.
८. ठाणे जि. मध्यवर्ती सहकारी बँक लि.
९. दि तासगाव अर्बन को. बँक लि.

### सुब्बलक्ष्मींचा गौरव

२३ ऑक्टोबर हा "युनायटेड नेशन्स" दिन म्हणून पाळला जातो. त्या दिवशी युनायटेड नेशन्सच्या जनरल असेंब्लीत गायनासाठी श्रीमती सुब्बलक्ष्मींना ऊ थांट ह्यांनी पाचारण केले आहे.

**सार्वत्रिक निवडणुकीतील मतदार**—येत्या सार्वत्रिक निवडणुकीत २५ कोटी मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील अशी माहिती प्रमुख निवडणूक अधिकारी श्री. सुंदरम ह्यांनी सांगितली आहे. निवडणुकीसाठी होणारा खर्च ८ कोटींच्या घरात जाईल.

### तारवाल्याजवळ प्रथमोपचाराची पेटी

ग्रेट ब्रिटनमधील काही तारवाल्यांना प्रथमोपचाराचे शिक्षण देण्यात येत आहे. तार मिळताच तीमधील मजकुरामुळे मूर्च्छा येऊन पडणाऱ्यांवर काय इलाज करावा, हे तारवाल्यांना शिकविले जाईल. तारेतील मजकूर पुष्कळ वेळा अशुभ असतो आणि तो वाचून कित्येकांना अनावर धक्का बसतो. तेथील तारवाल्यांच्या मोटारसायकलींवर आता प्रथमोपचाराची पेटी बसविली आहे. इतक्या सर्व तयारींचा आतापर्यंत एकदाच उपयोग झाला आहे, रस्त्यातील मोटर अपघातात जखमी झालेल्याला पट्टी बांधण्यासाठी !

बहुतेक वयस्कर लोकांना तारवाला पाहूनच घाबरायला होते. कारण, बहुधा मृत्यूची बातमी कळविण्यासाठीच तारेचा उपयोग केला जातो. ग्रेट ब्रिटनसारख्या देशात ही स्थिती, तर भारतासारख्या देशात तारेत अशुभ वार्ताच असणार, असा कित्येकांचा समज होणे स्वाभाविक आहे. जेव्हा पत्रेही क्वचितच लिहिली जात, तेव्हा पत्राच्या शिरोभागी 'क्षेम', 'कुशल' असे मुद्दाम लिहिले जाई; त्याचा उद्देश स्पष्टच आहे. संध्याकाळी तार आली, तर अगोदर जेवणे उरकून घेऊन नंतर तार फोडून वाचायची, असा प्रघात होता, त्याचाही हेतू उघड आहे. शिक्षण आणि दळणवळण ही वाढल्यामुळे तारेची भयानकता कमी झाली आहे; सुखरूप पोचल्याची, परीक्षा पास झाल्याची, मुलगा झाल्याची, वाढदिवसाच्या अभिनंदनाची, अशा तारांची संख्याच आता जास्त असते. तरीपण, अनपेक्षित वेळी, रात्रीच्या वेळी तार आली, तर आपण दचकतोच.

### विमानांचे सुटे भाग मिळविण्याचा आडमार्ग

गेल्या वर्षी झालेल्या भारत-पाक संघर्षात पाकिस्तानच्या हवाई दलाने अमेरिकेकडून देणगी म्हणून मिळविलेली काही सेबरजेट विमाने गमावली व काही नादुरुस्त झाली. नादुरुस्त झालेल्या विमानांची दुरुस्ती करणे सुट्या भागांच्या अभावी पाकिस्तानला शक्य नव्हते. कारण, अमेरिकेकडून नवीन सुटे भाग मिळत नव्हते. कॅनडाने पश्चिम जर्मनीला विकलेली विमाने प्रथम इराणला विकण्यात आली व इराणने ती पाकिस्तानला दुरुस्तीसाठी पाठविली. इराणने पाकिस्तानला दुरुस्तीसाठी पाठविलेल्या विमानांचे रहस्य आता उघडकीस आले आहे. ह्या विमानांतील जरूर ते सुटे भाग काढून घेऊन पाकिस्तानच्या नादुरुस्त विमानांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. दरम्यान इराण पाकिस्तानातील आपल्या विमानांसाठी परदेशांतून नवे सुटे भाग मिळवील. पाकिस्तानने ह्या आडमार्गाने कोंडी फोडली आहे.

### चौथ्या योजनेचा मसुदा

आर्थिक स्वावलंबन, राष्ट्रीय उत्पन्नात पुरेशा प्रमाणात वाढ आणि समाजवादी समाजरचना निर्माण करण्याच्या दृष्टीने अधिक वेगाने प्रगती करणे, ही आधीच्या पंचवार्षिक विकास योजनांत नमूद केलेली उद्दिष्टेच चौथ्या योजनेचाही आधार आहेत. चौथ्या योजनेचा मसुदा संसदेमध्ये नियोजन आणि समाजकल्याण मंत्री श्री. अशोक मेहता ह्यांनी सादर केला. या ४२२ पृष्ठांच्या मसुद्यात २५ प्रकरणे असून त्याचे दोन खंड आहेत. पहिल्या खंडात चौथ्या योजनेची भूमिका आणि धोरण ह्यासंबंधी विवेचन असून, दुसऱ्या खंडात विकास कार्यक्रम दिला आहे.


**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.**
**मुंबई**

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — ९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई. टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४, २५४७८१

: विभागीय कचेरी : — महाल : नागपूर. तारेचा पत्ता : फार्मर बँक

| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | रु. | ५,७८,२५,००० |
| गंगाजळी व फंड | ... | रु. | ३,१९,७१,००० |
| ठेवी | ... | रु. | ४९,५८,९६,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. | ९९,८७,२५,००० |

: शाखा :


(१) भायखळा (२) गोरेगाव (३) दादर (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सिताबर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


डॉ. वा. पु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. — श्री. चि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर वापरा. ४, ६ व ८ बैली फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )



श्री. वा. काळे ह्यांची

कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके

**१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल, ३ तुमचे स्थान कोणते ?**

## आंतरराष्ट्रीय पोलिस संघटनेची कामगिरी

चोरटा व्यापार करण्याच्या गुन्ह्यासाठी वॅलकॉट आणि त्याचा साथीदार ह्यांना नुकत्याच शिक्षा ठोठावण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय सीमांना न जुमानणारे किंबहुना त्याचा फायदा घेणारे अनेक गुन्हेगार असून त्यांचा तलास लावण्यास मदत करणारी आंतरराष्ट्रीय पोलिस संघटनाही आहे. ह्या संघटनेची परिषद बर्न येथे भरविण्यात आली होती. परिषद आठ दिवस चालली होती आणि तिच्या कार्यक्रमात भाग घेण्यासाठी ७५ देशांचे १४० प्रतिनिधी आले होते. गुन्हेगारांचा शोध लावण्याच्या काही अद्ययावत पद्धतींचा परिषदेत विचार करण्यात आला. परिषदेत जमा करण्यात आलेल्या माहितीवरून असे दिसते की जगातील सर्वच देशांत गुन्हेगारी वाढत चालली आहे आणि तिला आळा घालण्यासाठी निरनिराळ्या देशांच्या पोलिसांनी अधिक सहकार्य करणे जरूर आहे. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीत खोटी बनावट औषधे बनविणे व पुरविणे, अमली पदार्थांचा व्यापार करणे, खोट्या नोटांचा प्रसार करणे, विमानाची खोटी तिकिटे प्रसारात आणणे, इत्यादी अनेक प्रकारांचा समावेश आहे. विशेषतः अमली पदार्थांचा चोरटा व्यापार गेल्या काही वर्षांत वाढलेला दिसून आला. १९६५ साली २०० नव्या प्रकारच्या खोट्या बँक नोटा उघडकीस आणण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय पोलिस संघटनेचे प्रमुख कार्यालय पॅरिसजवळ आहे. तिच्या कचेरीत ३ लाख गुन्हेगारांबाबत तपशीलवार माहिती देणारी दप्तरे आहेत. त्यांपैकी ६० हजार गुन्हेगारांचे बोटांचे ठसेही उपलब्ध आहेत. गेल्या वर्षी ह्या संघटनेला ४ हजार आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांच्या तपासाचे काम अंगावर घ्यावे लागले. त्यांपैकी १,३०० प्रकरणे बनावट कागदासंबंधीची होती आणि १,१००अमली पदार्थांच्या चोरट्या व्यापाराची होती. संघटनेच्या सहकार्याने १,७०० गुन्हेगारांना अटक करण्यात आली. संघटनेची पुढील परिषद टोकिओ येथे भरविण्यात येणार आहे.

## बचतीच्या सवयींत बदल करण्याची जरुरी

राष्ट्रीय उत्पादकता मंडळा तर्फे 'बँकिंगच्या धंद्यातील उत्पादकता' ह्या विषयावर मुंबई येथे एक परिसंवाद घडवून आणण्यात आला होता. परिसंवादात बोलताना रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. पी. सी. भट्टाचार्य म्हणाले की हिंदमधील अर्थव्यवस्थेचा शेती हा एक महत्त्वाचा विभाग आहे. पण आतापर्यंत ह्या विभागाचे हात व्यापारी बँकांपर्यंत पोचले नाहीत. बँकिंगच्या धंद्याचा पुढील विकास साधताना ह्या बाबीकडे अधिक लक्ष पुरवावे लागेल. गेल्या १५ वर्षांत बँकिंगच्या धंद्याची प्रगती लक्षात भरण्यासारखी झाली असली तरी आगामी कालात बँकांना याहीपेक्षा अधिक कार्य करावे लागणार आहे. देशातील एकूण चलनापैकी लोकांच्या जवळ असलेल्या चलनाचा संचय अजूनही फार मोठा आहे. लोकांच्या जवळ असलेल्या चलनाचे प्रमाण फार मोठे असल्यामुळे वाढत्या अर्थव्यवस्थेला लागणारा पैसा पुरविण्याच्या बँकांच्या सामर्थ्याला साहजिकच मर्यादा पडतात. विकास पावत जाणाऱ्या अर्थव्यवस्थेत बँकांनीही काही प्रमाणात पुढाकार घेतला पाहिजे. त्याचबरोबर आपल्या ठेवीदारांची आणि ऋणकोंची कार्यक्षम सेवाही त्यांनी केली पाहिजे. बचत करण्याच्या लोकांच्या सवयींत त्यांनी बदल घडवून आणला पाहिजे. अजूनही सोन्यात, जडजवाहिरात अगर नोटांच्या स्वरूपात आपली बचत साठविण्याचे पुरातन मार्ग लोक चोखाळताना दिसतात. त्यांना बचत बँकांतून ठेवण्यासाठी आकृष्ट करण्यात आले पाहिजे. कारण, पुरातन मार्गाने करण्यात येणारी बचत ही अनुत्पादक आहे.

## अमेरिकेकडून गंधकाची आयात

येत्या १२ महिन्यांत अमेरिकेतील एका कंपनीकडून ३ लाख ६० हजार टन गंधकाची आयात करण्याचा करार स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने केला आहे. त्यांपैकी ३० हजार टनाचा पहिला हप्ता सहा आठवड्यांत भारताला पोचता करण्यात येईल व त्यानंतर अंतराअंतराने उरलेले गंधक आयात करण्यात येईल. गंधकाच्या आयातीमुळे खतकारखान्यांची अडचण बऱ्याच प्रमाणात कमी होईल. चालू वर्षी भारताला ४ लाख, ६५ हजार टन गंधकाची जरूर लागेल. पुढील वर्षी गंधकाची मागणी सहा लाख टनांच्या जवळपास जाईल असा अंदाज आहे. ह्यापूर्वी कॉर्पोरेशनतर्फे करण्यात आलेली गंधकाची आयात जरूर लागेल तसतशी परदेशांनी दिलेल्या मदतीमधून अगर वस्तूंच्या ऐनजिनसी बदलाच्या मार्गाने करण्यात येत असे. अशा रीतीने मे १९६५ पासून ७० हजार टन गंधक निरनिराळ्या देशांकडून मिळविण्यात आले आहे.

## हौशी प्रवाश्यांच्या उत्पन्नाचे रशियाला आकर्षण

पूर्व युरोपातील रुमानिया आणि बल्गेरिआ ह्या देशांनी हौशी प्रवाश्यांना आकर्षित करून घेण्यासाठी बऱ्याच सवलती जाहीर केल्यामुळे पश्चिम युरोपातील अनेक प्रवासी त्या देशांत सहलीसाठी जातात. त्यामुळे दोन्ही देशांना लाखो डॉलर्सचे उत्पन्न मिळते. आता रशियालाही डॉलर्स मिळविण्याच्या ह्या मार्गाचे आकर्षण वाटू लागले आहे. पश्चिम युरोपातील अनेक वृत्तपत्रांतून रशियाच्या अधिकृत प्रवाससंस्थेतर्फे जाहिराती देण्यात येत असतात. ह्या जाहिरातींमधून रशियांतील प्रवासाचे आकर्षण आवर्जून सांगण्यात आलेले असते. तथापि, रशियात प्रवासाला जाणाऱ्या परदेशी प्रवाश्यांनी ठरवून दिलेल्या मार्गाबाहेर पाऊल टाकल्यास त्यांच्यावर खटले भरून शिक्षा करणारे नियम रशियाने नुकतेच जाहीर केले आहेत.

## ब्रह्मदेशातील हिंदी बँकांची भरपाई

ब्रह्मदेशातील बँकांचे २३ फेब्रुवारी, १९६३ रोजी राष्ट्रीयीकरण झाले. राष्ट्रीयीकरण करण्यात आलेल्या बँकांना मिळावयाच्या भरपाईचे आकडे बँकिंग बिझिनेस नॅशनलायझेशन कमिटी ऑफ बर्माने आता जाहीर केले आहेत. भरपाईची एकूण रक्कम ४० लक्ष कियात ( १ कियात = १·५७५ रु. ) एवढी आहे. ह्या बँकांत खालील बँका आढळतात :—इंडियन ओव्हरसीज बँक १,४८,७१६ कियात, युनायटेड कमर्शिअल बँक २३,३५५ कियात, पंजाब नॅशनल बँक ९,६१,९११ कियात, नॅशनल ग्रिंडलेज बँक ९,४०,०५८ कियात आणि मर्कंटाइल बँक ऑफ इंडिया ५९,६२८ कियात.

## दि कॉसमॉस कोऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पुणे २

### सन १९६६–६७ ची अधिकारी मंडळे

**सल्लागार मंडळ**—( १ ) प्रा. न. का. घारपुरे, अध्यक्ष, ( २ ) मा. गं. मो. भणगे, उपाध्यक्ष, ( ३ ) मा. रा. द. भट, ( ४ ) मा. द. ग. देव, ( ५ ) मा. वि. ल. हर्डीकर.

**कार्यकारी मंडळ**—( १ ) मा. ह. गो. महाजन, कार्याध्यक्ष, ( २ ) मा. स. स. देशपांडे, उपकार्याध्यक्ष, ( ३ ) मा. अ. बा. देहाडराय, ( ४ ) मा. म. ना. परांजपे, ( ५ ) मा. सु. मा. कुलकर्णी, ( ६ ) मा. का. रा. कापरे, ( ७ ) मा. द. मो. पाटसकर, ( ८ ) मा. म. ग. खांडेकर, ( ९ ) मा. म. भ. राडकर, ( १० ) मा. भा. ग. रबडे, ( ११ ) मा. स. ब. भागवत.

**स्थानिक आयव्यय निरीक्षक**—मा. के. शं. कुलकर्णी, ( २ ) मा. म. ज. पेठे.

हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.